सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org

Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/शिष्यवृत्ती/२०२६/2303

दिनांक : 27 AUG 2026

**प्रति,**

**प्राचार्य,**

तंत्रशिक्षण संचालनालय अधिनस्त संलग्नित व्यावसायिक संस्था,

अमरावती विभाग, अमरावती.

**विषय : अनुसूचित जमातीच्या शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांकडुन शिक्षण शुल्काची कोणतीही रक्कम आकारण्यात येऊ नये, याबाबत संबधित महाविद्यालयांना निर्देश देण्याबाबत**

**संदर्भ** : उप आयुक्त, आदिवासी विकास,अमरावती यांचे पत्र क्र.शिष्यवृत्ती-२०२६/प्र.क्र./का-२(०३)/४३३३/२०२६

उपरोक्त विषयान्वये, आदिवासी विकास विभागातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काबाबत शासनाने कार्यपध्दती निश्चित केली आहे. शिष्यवृत्ती पात्र अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काचा लाभ शासनामार्फत अनुज्ञेय असून काही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून प्रवेश शुल्क (शिक्षण फी) व परिक्षा शुल्काची रक्कम स्विकारत असल्याने तसेच ज्या विद्यार्थ्यांची काही तांत्रिक अडचणी व शिष्यवृत्ती प्राप्त न झाल्यास त्यांची कागदपत्रे, गुणपत्रिका,दाखले महाविद्यालय स्तरावर अडवून ठेवत असल्याची बाब निदर्शनास आल्याचे व अशा प्रकारची अडवणूक करणाऱ्या संस्थाविरुध्द कार्यवाही करण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तरी याबाबत सर्व संस्थाना सूचित करण्यात येते की, आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी २०२२ मधील मुद्दा क्रमांक ०६ मधील अट क्रमांक १२ मधील तरतुदीनुसार संबधीत विद्यापीठे/शैक्षणिक संस्था/महाविद्यालय/तंत्रनिकेतन यांनी शिष्यवृत्ती करीता पात्र अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडुन शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क अथवा शासनाकडुन अनुज्ञेय असलेल्या कोणत्याही शुल्काची रक्कम आकारणी अथवा वसुल करु नये, याबाबत स्पष्टपणे निर्देशित करण्यात आलेले असताना शासनाच्या सदर निर्देशांची अंमलबजावणी न करता अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडुन प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क अथवा शासनाकडुन अनुज्ञेय असलेले इतर शुल्काच्या नावाखाली रक्कम आकारण्यात येते, ही बाब अतिशय गंभिर असून विद्यार्थ्यांना अनावश्यक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्याअनुषंगाने अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडुन प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क अथवा शासनाकडुन अनुज्ञेय असलेल्या कोणत्याही शुल्काची रक्कम आकारणी अथवा वसुल केल्यास संबधीत महाविद्यालय/शैक्षणिक संस्थेविरुध्द शासन नियमांनुसार कठोर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल.

ज्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्तीची रक्कम प्राप्त होऊनही परिक्षा शुल्क स्विकारले आहे त्यांची रक्कम तात्काळ परत करण्यात यावी व ज्या विद्यार्थ्यांची तांत्रिक अडचणीमुळे शिष्यवृत्ती प्राप्त झाली नाही त्यांचे मुळ दस्ताऐवज,गुणपत्रक,दाखला तात्काळ विद्यार्थ्यांस उपलब्ध करुन देण्यात यावे.

**सहपत्र** : वरीलप्रमाणे

**प्र.सहसंचालक**

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती.

**महाराष्ट्र शासन**
**अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती**
पोलीस मुख्यालयसमोर-टिबी हॉस्पीटलच्या मागे,कॅम्प अमरावती
दुरध्वनी क्रमांक : 0721-2553966 /2553667 ई-मेल - atc.amr-mh@gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

आदिवासी विकास विभाग
महाराष्ट्र शासन

जा.क्र./शिष्यवृत्ती-२०२६/प्र.क्र./का-२(०३)/4333 /२०२६ दिनांक- २४/०८/२०२६

**प्रति,**

१. मा.संचालक
तंत्र शिक्षण विभाग मुंबई

२. मा.सहसंचालक
तंत्र शिक्षण विभाग अमरावती / छ.संभाजी नगर

३. मा.कुलगुरु
संत गाडगे बाबा विद्यापीठ अमरावती.

४. मा.कुलगुरु
डॉ.बाबासाहेब आंबेडकर,मराठवाडा विद्यापीठ छ.संभाजी नगर

५. मा.कुलगुरु
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठ नांदेड

६. मा.कुलगुरु
डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठ अकोला.

७. मा.कुलगुरु
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी

८. मा.शिक्षणाधिकारी, **(प्राथमिक व माध्यमिक)**
जिल्हा परिषद शिक्षण विभाग,
अमरावती / अकोला / बुलडाणा / यवतमाळ / हिंगोली / परभणी/ छत्रपती संभाजी नगर / लातुर / जालना / बीड / नांदेड

सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती
आवक क्र. 3475 25.08.26

**विषय - अनुसूचित जमातीच्या शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्याकडुन शिक्षण शुल्काची कोणतीही रक्कम आकारण्यात येऊ नये, याबाबत संबधित महाविद्यालयांना निर्देश देण्याबाबत.**

**संदर्भ** - १.आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-शिष्यवृ-२०२१/प्र.क्र.९०/का- १२/दिनांक- १७ जानेवारी २०२२

२.अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्याचे दिनांक- २०.०८.२०२६ पासुन या कार्यालयात सुरु असलेले बेमुदत ठिय्या आंदोलन

३. मा.आयुक्त,आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य नाशिक यांचे पत्र क्रमांक -जा.क्र./शिष्य वृत्ती २०२६/प्र.क्र.०१/का-१०(०१)/५४५७/२०२६ दिनांक- १० जुलै २०२६

शि.वि
25/8/26

मा.महोदय / महोदया,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णय क्रमांक ०१ अन्वये आदिवासी विकास विभागातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काबाबत शासनाने कार्यपध्दती निश्चित केली आहे. सदर शासन निर्णयानुसार, शिष्यवृत्ती पात्र अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्याना शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काचा लाभ शासनामार्फत अनुज्ञेय आहे.

P.T.O

दि.२०ऑगस्ट २०२६ पासुन या कार्यालयात धरणे आंदोलन सुरु असून, काही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून प्रवेश शुल्क (शिक्षण फी) व परिक्षा शुल्काची रक्कम स्विकारत असल्याने तसेच ज्या विद्यार्थ्यांची काही तांत्रिक अडचणी व शिष्यवृत्ती प्राप्त न झाल्यास त्यांची कागदपत्रे, गुणपत्रिका, दाखले महाविद्यालय स्तरावर अडवून ठेवत असल्याची बाब या कार्यालयाचे संदर्भ क्र. ०२ अन्वये निदर्शनास आणून दिले आहे. आंदोलन कर्ते विद्यार्थ्यांकडुन याबाबत कार्यवाही करण्याची आग्रही मागणी केली आहे.

संदर्भिय क्र ०१ चे आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी २०२२ मधील मुद्दा क्रमांक ०६ मधील अट क्रमांक १२ मधील तरतुदीनुसार संबधीत विद्यापीठ / शैक्षणिक संस्था /महाविद्यालय /तंत्रनिकेतन यांनी शिष्यवृत्ती करीता पात्र अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्याकडुन शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क अथवा शासनाकडुन अनुज्ञेय असलेल्या कोणत्याही शुल्काची रक्कम आकारणी अथवा वसुल करु नये, याबाबत स्पष्टपणे निर्देशित करण्यात आलेले असताना शासनाच्या सदर निर्देशांची अंमलबजावणी न करता अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्याकडुन प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क अथवा शासनाकडुन अनुज्ञेय असलेले इतर शुल्काच्या नावाखाली रक्कम आकारण्यात येते, ही बाब अतिशय गंभीर असून त्यामुळे विद्यार्थ्यांना अनावश्यक आर्थिक अडचणीना सामोरे जावे लागत आहे.

त्याअनुषंगाने अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्याकडुन प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क अथवा शासनाकडुन अनुज्ञेय असलेल्या कोणत्याही शुल्काची रक्कम आकारणी अथवा वसुल केल्यास संबधीत महाविद्यालय / शैक्षणिक संस्थेविरुध्द शासन नियमांनुसार कठोर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल याबाबत आपल्या स्तरावरुन संबधित शैक्षणिक संस्था /महाविद्यालय /तंत्रनिकेतन यांना निर्देश देण्यात यावे.

ज्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्तीची रक्कम प्राप्त होऊनही परिक्षा शुल्क स्विकारले आहे त्यांची रक्कम तात्काळ परत करणेबाबत निर्देश देण्यात यावे व ज्या विद्यार्थ्यांची तांत्रिक अडचणीमुळे शिष्यवृत्ती प्राप्त झाली नाही त्यांचे मुळ दस्ताऐवज ,गुणपत्रक, दाखला तात्काळ विद्यार्थ्यांस उपलब्ध करुन देणेबाबत निर्देश देण्यात यावे. तसेच आपले स्तरावरुन सदरचे योजनेतील सर्व महाविद्यालयांचा आढावा घेवून कोणतेही महाविद्यालय अशा प्रकारचे शुल्क किंवा कागदपत्राची अडवणूक करणार नाही याबाबत आपल्या स्तरावरुन निर्देशित करण्यात यावे ही विनंती.

**मुळ प्रतिवर मा.अ.आ.यांची स्वाक्षरी आहे.**

(श्रीकांत धोटे)
**उप आयुक्त**
**आदिवासी विकास अमरावती**

**प्रत,**

१. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धारणी / पांढरकवडा / पुसद / किनवट / कळमनुरी / अकोला / छत्रपती संभाजी नगर याव्दारे आपणास कळविण्यात येते की, वरील महाविद्यालयाकडुन शासन नियमाप्रमाणे शिक्षण शुल्क किंवा परिक्षा शुल्क विद्यार्थ्याकडुन आकारण्यात येऊ नये याबाबत दक्षता घेण्यात यावी.

२. विद्यार्थी आंदोलन कृती समिती अमरावती यांना माहीतीस्तव

**उप आयुक्त**
**आदिवासी विकास अमरावती**